# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००१३७२

**अपिलार्थी श्री. ए. जी. एफ. बेग**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (अति./निष्का.)**
नायब तहसिलदार (अति./निष्का.) चेंबूर यांचे कार्यालय, १०वा रस्ता,
डी. के. सांडू गार्डन जवळ, ॲक्सीस बँकेच्यासमोर, चेंबूर (पू), मुंबई-४०० ०७१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (अति./निष्का.)**
नायब तहसिलदार (अति./निष्का.) चेंबूर यांचे कार्यालय, १०वा रस्ता,
डी. के. सांडू गार्डन जवळ, ॲक्सीस बँकेच्यासमोर, चेंबूर (पू), मुंबई-४०० ०७१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०५.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित ((ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०७.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित (----"----

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.१२.२०२१ | ३१.१२.२०२१/२८.०१.२०२२ | ०२.०२.२०२२ | ०७.०३.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस का उपस्थित राहू शकले नाहीत, याबाबतच्या लेखी खुलाशासह दिनांक २७.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणीस उपस्थित रहावे.**

प्रदीप व्यास
15-5-2024

**मुंबई**
**दिनांक : १५.०५.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
Greater Mumbai

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००१३७२**
**अपिलार्थी श्री. ए. जी. एफ. बेग**

**सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४ (In continuation of order dt.१५.०५.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २९.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचे अर्ज दि. २१.१२.२०२१ अनुसार वार्ड क्र. १४५ पार्ट- १० सी.टी.एस.नं. १५०, ग्लोरिस इंग्लिश स्कूल या शाळेजवळील कांदळवनाच्या बस स्टॉप जवळ ठेवण्यात आलेल्या कंटेनर बाबत या कार्यालयातून देण्यात आलेल्या परवानगी तसेच ना- हरकत प्रमाणपत्रबाबतची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०१.२०२२ नुसार अपिलार्थींना मुद्देनिहाय उत्तर दिले. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०२.०२.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दि. ०७.०३.२०२२ अनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांत पुरविण्यात यावी असे नोंदवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०३.०६.२०२४ चे निवेदन आयोगास असे सादर केले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांचा मागील सुनावणीस अनुपस्थितीबाबतचा खुलासा आयोगास सादर केला. तो अभिलेखावर घेण्यात आला.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोगपुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

27-6-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२४**